# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.

दिनांक : ६ ऑगस्ट २०२५

प्रति,
मान. पेटीशन ग्रुप फाऊंडेशन
माटुंगा मुंबई- 400055,

विषय : आश्रय योजना पुनर्विकास अंतर्गत असलेली गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग, दादर येथिल म. न. पा. चतुर्थ श्रेणी सफाई कामगार निवासस्थाने सदर योजनेच्या फेज-१ इमारती पूर्ण होईपर्यंत रिक्त करणेबाबत.

महोदय,

गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व) या सफाई कामगार वसाहतीच्या १ ऑक्टोबर २०१८ पासुन आश्रय योजने अंतर्गत पुनर्विकास करण्याचे काम चालू आहे या पुनर्विकासाच्या कामाला कोणत्याही कामगाराचा विरोध नाही. फेज १ साठी वसाहतीतील इ. क्र. १,२,३ व १२ ह्या ईमारती (१८० सदनिका) सन २००६ पासून रिक्त करून देण्यात आलेल्या आहेत. सदर कामगार हे गेल्या आजतागायत २२ वर्षापासुन वसाहतीच्या बाहेर राहत असून पुनर्विकासाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

मान. श्री. एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना दिनांक १ ऑक्टोबर 2023 रोजी या वसाहतीला दिलेल्या भेटीच्या वेळी त्यांनी मा. म. न. पा. आयुक्त ईकबालसिंह चहल आणि आमदार मा. कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर यांना दिलेल्या आदेशानुसार या वसाहतीमधिल आश्रय योजना पुनर्विकास अंतर्गत चालू असलेल्या फेज-१च्या

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.

दिनांक : ____________

त्यांची राहती घरे खाली करू नयेत असे आदेश दिले आणि संपूर्ण वसाहतीच्या दुरुस्ती करिता अंदाजे १५ कोटी खर्च केले. म.न.पा. पाली (जहर) आधिकारी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन सदनिका रिक्त करण्याबाबत नोटीस देऊन दबाव टाकत आहेत. त्यामुळे आम्ही कामगारांमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तरि आपणांस नम्र विनंती करतो की आपण ह्या सर्व घटनेचा विचार करून आम्ही सफाई कामगार रहिवाश्यांना फेज-१चे काम पूर्ण होईपर्यंत सद्यास्थितीत राहीलेल्या खोलीधारकांना घरे खाली करू नये ही विनंती.

आपले नम्र

शलाका राजेश जाधव — [signature]
निलाश सु. खैरे — [signature]
श्वेता सोमंथ चिखलकर — [signature]

सुप्रिया सुरेश कदम — S-S-Kadam
सुमित्रा महेंद्र सावंत — सुमित्रा सावंत
स्नेहा सुधीर सोनावणे — स्नेहा सु. सोनावणे

वर्षा विजय वाघे — Waghe
गौरव सुभाष जाधव — Jadhav

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.

दिनांक :- २९/०६/२०२५

MGC/AI 145
AMC(City)
22/07/2025

प्रति,
मा. भूषण गगराणी साहेब
मा. आयुक्त
बृहन्मुंबई महानगर पालिका मुख्यालय
मुंबई महानगरपालिका मार्ग, मुंबई-४००००१.

21 JUL 2025
MC.

विषय- तत्कालीन महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्री प्रविण दराडे यांचे कालखंडात सफाई कामगारांच्या घरांच्या आश्रय योजने संदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाचे पुनरावलोकन (Review) करणेबाबत.

महोदय,

गौतम नगर दादासाहेब फाळके मार्गावरील सफाई कामगारांची वसाहत १९४८ पूर्वीपासून विस्तारलेली आहे. यामधील प्रत्येक सदनिकाधारक हा दर्शित केलेल्या सालापूर्वीपासून वास्तव्यास आहे. ४१४ सदनिकाधारक वास्तव्यास होते त्यापैकी इ.क्र. १,२,३ व १२ नं. यातील सदनिकाधारकांच्या इमारती निष्कासीत करुन इतरत्र १२ ते १५ वर्ष वास्तव्यास आहेत.

त्या इमारतीच्या ठिकाणी SCR No.933 dt. 05-10-2018 निव इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांस ठेकेदारी प्रदान केले.

त्या वसाहती मध्ये आश्रय योजने अंतर्गत फेज-१ चा पुर्नविकास प्रत्यक्षात दिनांक ०१-१०-२०१९ पासून सुरुवात झाली.

फेज -१ च्या २ टोलेजंग इमारती मध्ये तळमजला प्लस २३ मजले असा प्रकल्प असून जुलै २०२५ पर्यत १४ मजले पर्यत बांधकाम अत्यंत धिम्या गतीने सुरु आहे. यांच्या अडचणी महापालिकेला ज्ञात आहेत.

..२..

AMC/C/L/ 3276
AMC (P)
24.07.25

→AMC/P 2879
25-07-25

→Dy.Ch.E(AYL)
29-07-2025

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.


दिनांक : २७/०६/२०२५



उर्वरित जागेत इ.क्र. ४ , ५ व बैठया चाळी आहेत त्यामध्ये २४४ सदनिकाधारक राहत आहेत.

फेज-१ चे काम पूर्ण न करता तत्कालीन मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री प्रविण दराडे यांचे कालखंडात गौतम नगर दादासाहेब फाळके मार्ग या वसाहतीचा सरसकट सदनिकाधारकांना रिक्त करुन आश्रय योजनेचा पुर्नविकास करावा असा आदेश निर्गमित करण्यात आला.

पुर्नविकासाला सफाई कामगारांचा अजिबात विरोध नाही हे प्रथमदर्शी महापालिकेच्या निदर्शनास आणून देत आहोत.

उर्वरित जागेत २४४ सदनिकाधारक वास्तव्यास आहेत यांना महापालिका विस्थापित भाडे व घरभाडे भत्ता कमीत कमी रुपये २००००/- आणि ८०००/- मिळून रुपये २८ हजार (अंदाजीत) देऊ करीत असून तर २४४ सदनिकाधारकांना ६८ लाख ,३२ हजार एवढा निधी महिन्याला भाडया पोटी दिली जाते तर १२ महिन्याला ८ करोड १९ लाख ८४ हजार पेक्षा जास्त निधी भाडयापोटी सफाई कामगार सदनि धारकांना दिली जाईल हा निधी किती वर्ष दिला जाणार आहे?

उर्वरित सफाई कामगारांना रिक्त न करता फेज-१ मधील इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन नंतरच फेज-२ च्या पुर्नविकासाला सुरुवात करावी.

अगोदरच १७० सदनिकाधारक १५ वर्ष बाहेर वास्तव्यास आहे हिच परिस्थीती उर्वरित सदनिकाधारकांवर येईल काय? असे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.

दिनांक : ____________



तत्कालीन महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त श्री प्रविण दराडे यांचे कालखंडात घेण्यात आलेल्या निर्णयाचे पुनरावलोकन (Review) करुन फेज-१ चे बांधकाम पूर्ण करावे. बाहेर वास्तव्यास असलेले १७० सदनिकाधारक व उर्वरित सदनिकाधारक २४४ असे मिळून ४१४ पैकी ९० टक्के सफाई कामगार सदनिकाधारक या फेज-१ च्या टोलेजंग इमारती मध्ये स्थांलातर होतील देण्यात येणारे विस्थापीत व घरभाडे हे महापालिकेच्या तिजोरीत सुरक्षित राहून हा निधी सफाई कामगारांच्या इतर कल्याणकारी योजने करिता वापरण्यास उपयुक्त ठरेल.

मान. श्री. एकनाथजी शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी गौतमनगर या वसाहतीला दिलेल्या संयुक्त भेटीच्या वेळी त्यांनी म.न.पा. आयुक्त इक्बालसिंह चहल व आमदार मा. कालिदासजी कोळंबकर यांना मौखिक दिलेल्या आदेशानुसार वसाहती मधील आश्रय योजना युध्द पातळीवर करुन पूर्ण होईपर्यत येथील म.न.पा. सदनिकाधारकांना त्यांची राहती घरे रिक्त करु नयेत असे आदेश दिले.

संपूर्ण वसाहतीच्या दुरुस्ती करिता अंदाजे १२ ते १५ कोटीपेक्षा जास्त रुपये खर्च केले हे आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.

स.मु.प. चाळी (शहर) अधिकारी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन सदनिका रिक्त करण्याबाबत नोटीस देऊन दबाव टाकत आहेत. त्यामुळे येथील सफाई कामगारांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. भितीचे वातावरण निर्माण करुन सफाई कामगार सदनिकाधारकांवर निलंबनाची कारवाई केली जाईल असे अधिका-यांकडून सांगण्यात येते.

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.

दिनांक : २७/०६/२०२५



या पत्राचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन दखल घ्यावी व आम्हां उर्वरित सफाई कामगार सदनिकाधारक यांना रिक्त न करता योग्य तो न्याय दयावा हिच अपेक्षा करीत आहोत.

अशी आग्रहाची नम्र विनंती .

कृपया या पत्राची उत्तरादाखल पत्राची अपेक्षा करीत आहोत.

कळावे,

टिप- सोबत महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री यांनी केलेल्या आदेश व स्वाक्षरीचे पत्र जोडत आहोत.

आपले नम्र,

राजेश गंगाराम जाधव
मो.नं. ९९६७६२९०८४

संदीप जाधव

विलास खैरे

नारायण सोलंकी
मो.नं.९९३०६९९२०२

शलाका राजेश जाधव

दिनाबेन लाखा राठोड

श्वेता सोमंध चिखलकर

सुप्रिया सुरेश कदम

संजना संतोष गायकवाड

वर्षा विजय तांबे

भारती गायकवाड

संचिता जाधव

रामचंद्र डाया वाघेला

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

क्र.एमजीसी/ए/9745

दिनांक: 17/10/2025

आमदार कैंप ✓ 9819253565

आ. देश बापनो

MCH
दि. 17/06/2025

प्रति,

मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब

उपमुख्यमंत्री तथा नगरविकास व पालकमंत्री मुंबई

महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२.

विषय:- आश्रय योजना पुनर्विकास अंतर्गत असलेली गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग, दादर येथील म.न.पा चतुर्थ श्रेणी सफाई कामगार निवासस्थाने सदर योजनेच्या फेज-१ इमारती पूर्ण होईपर्यंत रिक्त न करणे...

आयुक्त BMC

अतिरिक्त आयुक्त (शहर)

महोदय,

गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व) या सफाई कामगार वसाहतीचा १ ऑक्टोबर २०१८ पासून आश्रय योजने अंतर्गत पुनर्विकास करण्याचे काम चालू असून या पुनर्विकासाच्या कामाला कोणत्याही कामगाराचा विरोध नाही. फेज - १ साठी वसाहतीतील ई.क्र. १,२,३ व १२ ह्या इमारती (१८० सदनिका) सन २००६ पासून रिक्त करून देण्यात आलेल्या आहेत. सदर कामगार हे गेल्या आजतागायत २२ वर्षांपासून वसाहतीच्या बाहेर राहत असून पुनर्विकासाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. मनपा अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार येत्या वर्षभरात फेज -१ चे पुनर्विकासाचे काम पूर्ण होणार आहे. फेज-१ चे काम पूर्ण होण्याअगोदरच फेज -२ चे काम चालू करण्यासाठी सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेऊन मनपा अधिकारी वसाहतीतील उर्वरित सर्व सदनिका रिक्त करण्यासाठी कामगारांवर निलंबनाची कारवाई करण्याचा दबाव टाकत असून सदनिका रिक्त करण्यास सांगत आहेत.

मान. श्री. एकनाथ शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी या वसाहतीला दिलेल्या भेटीच्या वेळी त्यांनी मा. म.न.पा. आयुक्त ईकबालसिंह चहल आणि आमदार मा. कार्यसम्राट कालिदास कोळंबकर यांना दिलेल्या आदेशानुसार या वसाहतीमधील आश्रय योजना पुनर्विकास अंतर्गत चालू असलेल्या फेज-१ च्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत येथील म.न.पा. सदनिका धारकांना त्यांची राहती घरे खाली करु नयेत असे आदेश दिले आणि संपूर्ण वसाहतीच्या दुरुस्ती करिता अंदाजे १२ कोटीपेक्षा जास्त रुपये खर्च केले. स.मु.प चाळी (शहर) अधिकारी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेऊन सदनिका रिक्त करण्याबाबत नोटीस देऊन दबाव टाकत आहेत. त्यामुळे येथील कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महानगरपालिका आयुक्त

AMC (City)

फेज-१ चे बांधकाम हे फाळके रोड लगत असून पुनर्विकासासाठी चारही बाजुंनी भरपूर मोकळी जागा उपलब्ध आहे. परळ, दादर, नायगाव, शिवडी या संपूर्ण विभागामध्ये पुनर्विकासाचे काम मोठया प्रमाणात चालू असून भाडे तत्वावर रुम उपलब्ध नाहीत. तरी आम्ही आपणांस विनंती करीत आहोत की, फेज १ चे बांधकाम पूर्ण होईपर्यंत विभागातील उर्वरित सदनिका रिक्त करु नये.

आपले नम्र

राजेश गंगाराम जाधव (सही) — मो. ९९६७६२९०८४

शलाका राजेश जाधव (सही) — 9892493441

दिनाबेन लाद्या राठोड (सही)

श्वेता सौगंध चिखलकर (सही)

सुप्रिया सुरेश कदम (सही)

संजना संतोष गायकवाड (सही)

AMC/C/L/2184
17-06-25
AMC (P)
23-06-25

→ AMC/P/2109
25-06-2025

→ Dy.Ch.E(AYL) → HS
DyChE/593/AYC dt. 01.07.25

Jun 17 2025 11:12:46 A

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.

दिनांक : ३०जून २०२५

प्रति,

**मा. अभिजित बांगर साहेब**
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त
मुंबई महानगरपालिका मुख्यालय
सी.एस.टी., मुंबई.

अति. महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) यांचे कार्यालय
स्वीकारले
30-06-25
बृहन्मुंबई महानगरपालिका

AMd/P/P/560 → DMC(SWM)
01-07-25

**विषय- आश्रय योजने अंतर्गत गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व) मुंबई-१४ या सफाई कामगारांच्या वसाहतीचा फेज-१ चा पुर्नविकास जलद गतीने करणेबाबत.**

महोदय,

या पत्राद्वारे आपणांस नम्र विनंती करीत आहोत की, मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांसाठी आश्रय योजने अंतर्गत पुर्नविकास सुरु आहे.

गौतम नगर, दादासाहेब फाळके मार्ग, दादर (पुर्व) मुंबई-१४ या ठिकाणच्या वसाहतीचा पुर्नविकास करणेसाठी महानगरपालिकेने निव इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीस दिनांक १ ऑक्टोबर २०१८ पासून ठेकेदारी प्रदान केली.

या वसाहती मध्ये फेज-१ मध्ये २ (दोन) टोलेजंग २३ मजल्याच्या इमारती आहेत त्यांचे बांधकाम जून २५ अखेरीस १२ ते १३ मजले पर्यतच बांधकाम अत्यंत धिम्यागतीने सुरु असून या इमारती पूर्ण होण्याकडे महापालिकेचे दुर्लक्ष झालेले आहे. या २ टोलेजंग इमारती पूर्ण होण्यासाठी अडथळे कोणामुळे झाले हे महापालिकेला माहित असून या गौतमनगर मधील वसाहती मध्ये वास्तव्य करीत असलेले उर्वरित सफाई कामगारांना वेठीस धरु नये व रिक्त ही करु नये हि विनंती.

..२..

# गौतम नगर सफाई कामगार वसाहत कृती समिती (दादर) नियोजित

पत्ता: गौतम नगर बृहन्मुंबई महानगर पालिका कामगार वसाहत, दादासाहेब फाळके मार्ग, दादर, मुंबई - १४.


दिनांक : ____________



महापालिकेच्या या पुर्नविकासाला सफाई कामगारांचा विरोध नसून सफाई कामगार आपल्या संरक्षणाची बाजू महापालिकेसमोर निदर्शनास आणून देत आहे व विस्थापीत भाडयापोटी वसाहतीतील उर्वरित सफाई कामगारांना देण्यात येणारे भाडे हे रुपये ८ (आठ) करोड पेक्षा जास्त असून ही रक्कम इतरत्र सफाई कामगारांना स्थलांतरीत न करता सुरक्षित राहील.

आम्ही मुंबईचे सेवक सफाई कामगार महापालिकेकडे आग्रहाची विनंती करतो की, यापूर्वीचे सन २००६ पासून इ.क्र. १, २ , ३ व १२ नंबर यातील सफाई कामगार रहिवाशी यापुर्वीच सन २०२५ पर्यत बाहेर स्थलांतरीत केलेले आहेत. त्यामुळे फेज-१ चे इमारतीचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करावे. तसेच संक्रमण शिबीरातील सफाई कामगारां सहित सदनिकाधारकांना फेज -१ च्या २ इमारती मध्ये स्थलांतरीत करावे हि आम्ही आपणांकडे आग्रहाची विनंती करीत आहोत.

धन्यवाद ।

आपले नम्र,

| | | |
|---|---|---|
| (राजेश गं. जाधव) | (विलास सु. खैरे) | (नारायण सोलंकी) |
| (शलाका जाधव) | (श्वेता चिखलकर) | (सुप्रिया कदम) |
| (दिनाबेन राठोड) | (संजना गायकवाड) | (वर्षा वि. तांबे) |